# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 20 October 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २० ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- विधानसभा निवडणुकीसाठी भाजपची ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर, भोकर मधून श्रीजया चव्हाण, फुलंब्रीतून अनुराधा चव्हाण यांना उमेदवारी
- विधानसभा निवडणुकीत ज्या मतदारसंघात निवडून येण्याची शक्यता आहे, तिथं उमेदवार उभे करण्याची मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांची भूमिका
- कृषी उत्पादनांचा भाव आणि बाजारातली किरकोळ विक्री किंमत यातली तफावत कमी करण्यासाठी समिती स्थापन करण्याची केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांची माहिती

आणि

- बंगळूरु कसोटीत न्यूझीलंडचा भारतावर आठ गडी राखून विजय, मालिकेत एक – शून्य अशी आघाडी

****

विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने ९९ उमेदवारांची पहिली यादी आज जाहीर केली. यामध्ये मराठवाड्यातल्या १६ मतदारसंघांचा समावेश आहे. नांदेड जिल्ह्यात किनवट इथून भीमराव केराम, भोकर – श्रीजया अशोक चव्हाण, नायगाव – राजेश पवार, तर मुखेड विधानसभा मतदारसंघातून तुषार राठोड यांना उमेदवादी देण्यात आली आहे. हिंगोली मतदारसंघातून तान्हाजी मुटकुळे, जिंतूर – मेघना बोर्डीकर, परतूर – बबनराव लोणीकर, बदनापूर – नारायण कुचे, तर भोकर मतदारसंघातून संतोष दानवे यांना उमेदवारी जाहिर झाली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या फुलंब्री मतदारसंघातून अनुराधा चव्हाण, औरंगाबाद पूर्व – अतुल सावे, तर गंगापूर विधानसभा मतदारसंघातून प्रशांत बंब यांना उमेदवारी देण्यात

आली आहे. केज मतदारसंघातून नमिता मुंदडा, निलंगा – संभाजी पाटील निलंगेकर, औसा – अभिमन्यू पवार, आणि तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून राणा जगजितसिंह पाटील निवडणूक लढवणार आहेत.

याशिवाय नागपूर दक्षिण – पश्चिम मतदारसंघातून देवेंद्र फडणवीस, कामठी – चंद्रशेखर बावनकुळे, जामनेर – गिरीष महाजन, शिर्डी– राधाकृष्ण विखे पाटील, मुंबईत मलबार हिल मधून मंगलप्रभात लोढा, तर कोलाबा मधून राहुल नार्वेकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

****

विधानसभा निवडणुकीत ज्या मतदारसंघात निवडून येण्याची शक्यता आहे, तिथं उमेदवार उभे करावेत, तसंच इतर ठिकाणी मराठा आरक्षणाला समर्थन देणाऱ्याला मतदान करावं, असं आवाहन मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी केलं आहे. विधानसभा निवडणुकीत उमेदवार पाडायचे की निवडणूक लढवायची, याबाबत निर्णय घेण्यासाठी आज अंतरवाली सराटी इथं निर्णायक बैठक पार पडली, त्यानंतर ते बोलत होते. जिथे आपला उमेदवार उभा करणार नाही, तिथे जो उमेदवार ५०० रुपयाच्या बॉण्डवर आपल्याला समर्थन देईल, त्या उमेदवाराला मतदान करायचं, तसंच मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना पाडायचं, अशी भूमिका जरांगे यांनी जाहीर केली. कोणत्या मतदारसंघात मराठा समाजाची ताकद आहे, हे तपासणं गरजेचं असल्याचं ते म्हणाले.

****

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक राजकीय पक्षांचे नेते पक्षांतर करत आहेत.

दिवंगत आमदार विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती मेटे यांनी आज मुंबईत आपल्या प्रमुख कार्यकर्त्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. यावेळी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्यासह प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार सुप्रिया सुळे उपस्थित होते. बीड विधानसभेसाठी आपण पक्षाकडे प्रस्ताव दिला असून, संघटनेच्या सामाजिक कार्याला राजकीय जोड देण्यासाठी हा प्रवेश केल्याचं ज्योती मेटे यावेळी म्हणाल्या.

****

नंदूरबार जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष भरत गावित यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पक्षाचे अध्यक्ष अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी त्यांचं पक्षात स्वागत केलं.

****

बीड इथले भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी आज भाजपला सोडचिठ्ठी देत असल्याचं जाहीर केलं. आज वार्ताहरांशी बोलताना त्यांनी पुढची राजकीय दिशा लवकरच जाहीर करु, असं सांगितलं.

****

वंचित बहुजन आघाडीचे माजी पश्चिम विदर्भ अध्यक्ष डॉक्टर सिद्धार्थ देवळे यांनी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. मुंबई इथं पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत हा पक्ष प्रवेश सोहळा पार पडला. देवळे यांनी यावर्षीच्या लोकसभा निवडणुकीनंतर वंचित बहुजन आघाडीतील आपल्या पदाचा आणि पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता.

****

बीड जिल्ह्यात सहाही विधानसभा सार्वत्रिक निवडणूक मतदार संघात मतदान यंत्रांचं प्रथमस्तरीय संगणकीकृत सरमिसळ आज करण्यात आली. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अविनाश पाठक, उपजिल्हानिवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे, तहसीलदार अविनाश शिंगटे यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी दोन हजार ८९७ बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट आणि तीन हजार १३८ व्हीव्हीपॅटचं वाटप विधानसभा मतदार संघांना करण्यात आलं.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज नाशिक जिल्ह्यातल्या सात मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर बँकॉकहून आलेल्या एक प्रवाशाकडून सुमारे आठ किलोहून अधिक गांजा जप्त करण्यात आला असून, या गांजाची किंमत अंदाजे ८ कोटी रुपये इतकी आहे. या प्रवाश्याने

हा गांजा खेळणी आणि अन्नपदार्थांच्या डब्ब्यात लपवला होता. या व्यक्तीला अंमली पदार्थ नियंत्रण कायद्याखाली अटक करण्यात आली असून, प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

****

कृषी उत्पादनं आणि बागायती उत्पादनांचा शेतकऱ्यांना मिळणारा भाव आणि या उत्पादनांची बाजारातली किरकोळ विक्री किंमत यातली तफावत कमी करण्यासाठी सरकार एक समिती स्थापन करणार आहे, अशी माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली. ते आज नवी दिल्लीत एका कृषी परिषदेत बोलत होते. शेतकरी आपला भाजीपाला पाच रुपये किलो भावानं विकतात आणि किरकोळ बाजारात मात्र तो ५० रुपये किलो भावानं विकला जातो, ही तफावत कमी करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्याचं काम ही समिती करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. कृषी संशोधनाचे फायदे प्रयोगशाळेपासून शेतापर्यंत पोहचवण्यासाठी पुढच्या महिन्यापासून 'कृषी चौपाल' उपक्रमाचा प्रारंभ केला जाणार असल्याची माहिती चौहान यांनी दिली.

****

दिवाळी आणि छटपूजा या सणांसाठी उत्तर आणि पूर्वेकडच्या राज्यांकडे जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेनं ५७० विशेष फेऱ्या जाहीर केल्या आहेत. मुंबई, पुणे आणि नागपूरसह विविध ठिकाणांहून या फेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. १३२ फेऱ्या मुंबईहून, तर १४६ फेऱ्या पुण्याहून निघणार आहेत. तर १०८ फेऱ्या लातूर, सावंतवाडी, नागपूर, पुणे, कोल्हापूर, नांदेड आणि इतर ठिकाणी पोचणार आहेत. या रेल्वेंमध्ये वातानुकूलित, शयनयान आणि सर्वसाधारण डब्यांचा समावेश आहे. दक्षिणेकडच्या करीमनगर, कोचुवेली, काझिपेट आणि बेंगळुरूसाठी ८४ फेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.

****

बंगळूरु कसोटीत न्यूझीलंडनं भारतावर आठ गडी राखून विजय मिळवत, तीन सामन्यांच्या मालिकेत एक-शून्य अशी आघाडी घेतली. पहिल्या डावात अवघ्या ४६ धावा करणाऱ्या भारतीय संघानं, दुसऱ्या डावात पुन्हा उभारी घेत न्यूझीलंडवर वर्चस्व गाजवलं होतं. मात्र, ३५६ धावांची पिछाडी भरून काढल्यावर भारतीय फलंदाजांना आव्हानात्मक धावसंख्या उभारण्यात अपयश आलं. न्यूझीलंडसमोर विजयासाठी ठेवलेलं १०७ धावांचं माफक आव्हान या संघानं केवळ दोन

फलंदाजांच्या मोबदल्यात पार केलं. पहिल्या डावात वेगवान शतकी खेळी करून न्यूझीलंडच्या विजयाचा पाया रचणाऱ्या आणि दुसऱ्या डावात नाबाद राहात विजय मिळवून देणाऱ्या न्यूझीलंडच्या रचिन रविंद्रला सामनावीराचा किताब मिळाला.
न्यूझीलंडने तब्बल साडेतीन दशकांनंतर भारताला भारतात पराभूत केल्यानं न्यूझीलंडसाठी हा विजय ऐतिहासिक ठरला आहे. यापूर्वी १९८८ मध्ये न्यूझीलंडने भारतावर विजय मिळवला होता.

****

नांदेड इथं तीन दिवसीय राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या क्रीडा स्पर्धेचा आज दुसरा दिवस आहे. श्री गुरुगोबिंदसिंघजी क्रीडा संकुलात सुरू या स्पर्धेत चौदा –सतरा– एकोणवीस वर्षाखालच्या वयोगटातले राज्यभरातले खेळाडू सहभागी झाले आहेत. मतदार जनजागृतीच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत स्पर्धेच्या पहिल्या दिवशी स्पर्धेतल्या खेळाडूंसह नव मतदारांना मतदान करण्याविषयी शपथ देण्यात आली.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूरचे माजी आमदार नरेंद्र बोरगावकर यांचं आज पहाटे पुण्यात एका खाजगी रुग्णालयात निधन झालं, ते ८७ वर्षांचे होते. बोरगावकर यांनी लातूर, बीड, धाराशिव या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाचं काही काळ प्रतिनिधित्व केलं होतं. तत्कालीन उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केलं होतं. त्यांच्या पार्थिव देहावर आज तुळजापूर इथं अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

****

लातूर जिल्ह्यात, सध्याच्या सणाच्या काळात भाडेवाढ करणाऱ्या खाजगी वाहतूकदारांकडून वाजवीपेक्षा जास्त प्रवासी भाडे आकारल्यास प्रवाशांना त्याची तक्रार करण्यासाठी प्रादेशिक परिवहन विभागाच्या ई–मेल सुविधेचा वापर करावा असं आवाहन विभागिय प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण यांनी केलं आहे.

****

नांदेड जिल्ह्यात दोन दिवसात अतिवृष्टीची नोंद झाली. आज सकाळी अप्पर मानार धारणाचे पाच तर विष्णुपुरी प्रकल्पाचा एक दरवाजा उघडला आहे. यंदा १०६ पूर्णांक ९३ टक्के पावसाची नोंद झाली असून, पावसानं सरसरी ओलांडल्याचं वृत्त आहे.

जालना जिल्ह्यातल्या परतूर तालुक्यातल्या निम्न दुधना प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात काल रात्री कोसळलेल्या जोरदार पावसामुळे प्रकल्पात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरु आहे.

****